# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दुरध्वनी / फॅक्स : २५६५६२३४, E-Mail : ropune.dte@gmail.com; Website www.ropune.org.in


जा.क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/सुसेआप्रयो/२०१९/ 3841

**परिपत्रक**

दिनांक : 18 SEP 2019

**विषय :- सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत गट क व गट ड पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची माहिती तपासणी बैठक ---**

संदर्भ :- १. शासन निर्णय,वित्त विभाग निर्णय क्रमांक वेतन ११११/प्र.क्रं.३/२०१९/सेवा-३,दि.०२/०३/२०१९
२. या कार्यालयाचे पत्र क्रं.तंशिविकापु/आस्था-३(अ)/सुसेआप्रयो/२०१९/२८४६दि.०९/०७/२०१९
३. या कार्यालयाचे पत्र क्रं.तंशिविकापु/आस्था-३(अ)/सुसेआप्रयो/२०१९/३६०८ दि. ३०/०८/२०१९

सर्व संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयातील तरतूदी नुसार तसेच संदर्भ क्रं.०२ अन्वये आपल्या संस्थेतील / कार्यालयातील गट-क व गट-ड संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांना पुर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२/२४ वर्षानंतर (दिनांक ०१/०१/२०१६ ते दिनांक ३१/०३/२०१९ पर्यतच्या कालावधीत) यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे. त्यांना १०/२०/३० वर्षानंतर अनुज्ञेय असणारी तीन लाभांची सुधारीत सेवातंर्गत आश्वासित योजना लागू करण्याकरीता तसेच ज्या कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०१/२०१६ नंतर दिनांक ३१/०३/२०२० पर्यतच्या कालावधीत सेवेची १०-२०-३० वर्ष पुर्ण होत आहेत. अशा गट क व गट ड कर्मचाऱ्यांची माहिती मागवण्यात आलेली होती. संदर्भ क्रं.०३ अन्वये संस्थास्तरावरून प्राप्त झालेल्या माहितीची पडताळणी केली असता त्यात बऱ्याच त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसाठी खालील बाबींची तपासणी करण्यात यावी. तसेच खालील सर्व सेवापुस्तकातल्या नोंदीनुसार फ्लॅग लावण्यात यावेत.

१. सेवेतील प्रथम नियुक्तीचा दिनांक, पदनाम, जन्म दिनांक
२. असाधारण रजा (विनावेतन) असल्यास त्या त्या कालावधीचा तपशील
३. कर्मचा-यास सेवा कालावधीत प्रत्यक्ष पदोन्नती/ प्रत्यक्ष देण्यात आलेले लाभ यांची नोंद.
४. ज्या दिनांकास १०/२०/३० नुसार कर्मचारी लाभास पात्र होत असेल त्या दिनांकानुसार मत्ता व दायित्वे सादर केल्याचा दिनांक
५. ज्या दिनांकास १०/२०/३० नुसार कर्मचारी लाभास पात्र होत असेल त्या दिनांकानुसार मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवालाची प्रतवारी .
६. सेवापुस्तकात घेण्यात आलेल्या नोंदींच्या अनुषंगाने संगणक अर्हता, मराठी/हिंदी भाषा सूट, विभागीय परीक्षा उत्तीर्ण अथवा सूट (लिपीकवर्गीय कर्मचा-यांसाठी), जातवैधता प्रमाणपत्र नोंद, पहिला लाभ/दुसरा लाभ मिळाल्यांच्या नोंदी, चारित्र्य पडताळणी नोंद इत्यादी ठिकाणी फ्लॅग लावण्यात यावेत.

तरी खालील तक्यात नमुद केलेल्या संस्थांनी/कार्यालयांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास व वेळेत या कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीस आवश्यक ती कागदपत्रे,प्रस्ताव सादर केलेल्या कर्मचाऱ्यांची मुळ सेवापुस्तके व गोपनीय अहवालाच्या मुळ नस्तीसह उपस्थित रहावे.

| अ.क्रं | संस्थेचे/कार्यालयाचे नाव | बैठकीचा दिनांक | बैठकीची वेळ |
|---|---|---|---|
| १ | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविदयालय, अवसरी (खुर्द) | १९/०९/२०१९ | सकाळी ११.०० वाजता |
| २ | शासकीय तंत्रनिकेतन,अवसरी (खुर्द) | | सकाळी ११.०० वाजता |
| ३ | महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अॅन्ड केटरींग टेक्नॉलाजी, पुणे | | दुपारी २.३० वाजता |
| ४ | शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे | | दुपारी ३.०० वाजता |
| ५ | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,विभागीय कार्यालय, पुणे | | दुपारी ४.०० वाजता |
| ६ | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे | २०/०९/२०१९ | सकाळी ११.०० वाजता |
| ७ | शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, कराड | २१/०९/२०१९ | सकाळी ११.०० वाजता |
| ८ | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव | | |
| ९ | शासकीय तंत्रनिकेतन,कराड | २३/०९/२०१९ | सकाळी ११.०० वाजता |
| १० | शासकीय औषधनिर्माण शास्त्र महाविदयालय, कराड | | |
| ११ | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर | २४/०९/२०१९ | सकाळी ११.०० वाजता |
| १२ | शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | २५/०९/२०१९ | सकाळी ११.०० वाजता |
| १३ | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर | २६/०९/२०१९ | सकाळी ११.०० वाजता |
| १४ | अभियांत्रिकी महाविदयालय, पुणे | २७/०९/२०१८ | सकाळी ११.०० वाजता |

तरी संस्थेचे प्रबंधक अथवा कार्यालय अधिक्षक व संबधीत काम पाहणारे कर्मचारी यांनी वरील दिनाकांनुसार या कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीस आवश्यक ती कागदपत्रे, प्रस्ताव सादर केलेल्या कर्मचा-यांची मुळ सेवापुस्तके व गोपनीय अहवालाच्या मुळ नस्तीसह उपस्थित रहावे.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी —**

१. संचालक/प्राचार्य,
   अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे / शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड / शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)/ शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय कराड
२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे / कराड / कोल्हापूर / सोलापूर / मिरज / अवसरी खुर्द
३. प्राचार्य, शासकीय दुरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे
४. प्राचार्य, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगाव
५. प्राचार्य, महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अॅन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे
६. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे
७. या कार्यालयातील प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्तळावर प्रदर्शित करण्यासाठी.
८. आस्था ३ (ब), आस्था-४